**विशेष दिवाणी दावा क्रमांक ७८/२०१०**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००००२४-२०१०)

**निशाणी क्रमांक १२२ वरील आदेश**

वादींनी सदरचा अर्ज दावा दुरूस्तीकरिता व आवश्यक पक्षकारांना सामील करण्याची परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथन थोडक्यात असे :-

वादींनी सदरचा दावा, वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.१ यांच्यामध्ये झालेल्या इसार पत्राप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत करून द्यावे यासाठी दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादी क्र. १ यांचेकडुन दावा मिळकतीचे इसारपत्र करून घेतले होते, परंतु, प्रतिवादी क्र.१ याने वादींची फसवणुक करून दावा मिळकतींचे खरेदीखत प्रतिवादी क्र.३ चे लाभात करून दिले, त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याविरूद्ध विशिष्ट कराराची पुर्तता करून मिळणेकरीता दाखल केला आहे.

०३. वादी पुढे असे कथन करतात की, सदरचा दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.३ याने दावा मिळकतीचे खरेदीखत दि.२५.०२.२०२१ रोजी श्री. चंद्रभान लक्ष्मीनारायण करवा, श्री. जोगिंदरलाल हंसराज राजपाल व श्री. रमेश सुर्यभान दिवटे यांच्या लाभात करून दिले आहे. त्यामुळे सदर खरेदीदारांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन सामिल करणे गरजेचे आहे. वादींना दि.२५.०२.२०२१ रोजीच्या खरेदीखताबाबत दाव्यामध्ये काही मजकुर नमुद करणे आवश्यक आहे. सदर दावा प्रलंबित आहे याची माहिती असुन देखील सदर खरेदीदारांनी दावा मिळकत खरेदी केली आहे. सबब, दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करण्यास तसेच सदर खरेदीदारांना (प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांना) दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.४ ते ६ म्हणुन सामील करण्यास परवानगी मिळावी, अशी विनंती वादींनी केली आहे.

०४. वादींचे सदर अर्जास प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. प्रतिवादी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन करतात की, वादींचा अर्ज चालण्यायोग्य नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्यामध्ये इसारपत्र हे दिनांक ३१.०३.२००१ व दि. २५.०६.२००१ रोजी झालेले आहे परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.३ यांच्याशी दिनांक

१२.१२.२००७ रोजी दावा मिळकतीबाबत व्यवहार केला आहे. वादींनी दि.११.०२.२०१३ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, परंतु बरेच वेळा मुदती घेवुनही ते उलटतपासासाठी न्यायालयासमक्ष आले नाहीत, त्यामुळे न्यायालयाने वादींचा पुरावा बंद करण्याचा आदेश दि.२९.०६.२०१५ रोजी पारीत केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांचा पुरावा झाला, परंतु त्यांचाही उलटतपास वादींनी घेतला नाही, त्यामुळे त्यांच्याविरूद्ध उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

०५.		प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, दि.२०.०१.२०१७ रोजी प्रतिवादींचा पुरावा संपलेला आहे, तसेच प्रस्तुतचे प्रकरण अंतिम युक्तिवादाकरीता नेमलेले आहे. वादींनी दिनांक ०४.०१.२०२२ रोजी नविन वकिलांचे वकिलपत्र दाखल करून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी सदर दावा मिळकत दि.२५.०२.२०२१ रोजीच प्रस्तावित प्रतिवादी यांना विक्री केलेली आहे. वादींना नव्याने दुरूस्ती करून दावा प्रथमपासुन चालवता येणार नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी केलेली आहे.

०६.		प्रतिवादी क्र.२ यांनी म्हणणे दाखल केले नाही.

०७.		वादी व प्रतिवादींतर्फे युक्तिवाद ऐकला व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा दि.३१.०३.२००१ व २५.०६.२००१ रोजीच्या इसारपत्राची पुर्तता करून दावा मिळकतीचे खरेदीखत करून दयावे याकरीता दाखल केला आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीचे इसारपत्र वादी क्र.१ व २ यांचे नावे दि.३१.०३.२००१ व २५.०६.२००१ रोजी करून दिले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यानंतर दि.१२.१२.२००७ रोजी सदर दावा मिळकत प्रतिवादी क्र.३ यांना विक्री केली, त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. सदर दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. ३ यांनी पुन्हा दावा मिळकत प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांना विक्री करून दिली आहे.

०८.		सदर दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.३ यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या लाभात करून दिले आहे ही बाब प्रतिवादींनी देखील

नाकारलेली नाही. सदरची घटना ही दावा दाखल केल्यानंतर घडलेली आहे, त्यामुळे दावा दुरूस्तीद्वारे ती अभिलेखावर आणण्यासाठी वादींना परवानगी देणे न्यायाच्या दृष्टिने योग्य होईल असे मला वाटते. प्रस्तावित प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी सदर दावा मिळकत प्रतिवादी क्र. ३ यांचेकडुन खरेदी केली आहे, त्यामुळे याकामी त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून सदर दाव्यामध्ये सामील करून घेणे गरजेचे आहे. सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणवत्तेवर होण्यासाठी, याकामी पक्षकारांमध्ये पुन्हा पुन्हा दावे उत्पन्न होवु नयेत या कारणांसाठी तसेच दोन्ही पक्षकारांतील वादाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी सदर दावा दुरूस्तीस परवानगी देणे न्यायाचे दृष्टिने योग्य होईल. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज रू.१,०००/- खर्च लादून मंजुर करण्यात येतो. सदरचा खर्च प्रतिवादींना देण्याचा आहे.

२. वादींनी सदरची दुरूस्ती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी.

Sangita Pundlik Babar
Digitally signed by Sangita Pundlik Babar
Date: 2022.06.29 13:52:30 +0530

(श्रीमती. एस. पी. बाबर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २८.०६.२०२२.